05 DEC 2022

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योग-शैक्षणिक संस्था यांच्यातील परिसंवाद काळाची गरज

## प्र. कुलगुरू प्रा.डॉ.पी.एस.पाटील यांचे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी)-**

आजच्या स्पर्धेच्या युगात उद्योग संस्था यांच्यात परस्पर संवाद, उद्योगाशी मजबूत संबंध विकसित करण्यास मदत होते, हे विद्यार्थ्यांनीओळखून कष्टाची सीडी प्रचंड मोठी आहे ती कोणीच रोखू शकत नाही यासाठी विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीतून स्वतःला नवनवीन कौशल्यांच्या जोरावर अद्यावत करणे गरजेचे आहे. जिद्द, चिकाटी, साहस, प्रचंड मेहनत व विविध कौशल्य आत्मसात करून जीवनात यशस्वी होता येते तसेच उद्योग-शैक्षणिक संस्था यांच्यातील परिसंवाद काळाची गरज, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए विभागाच्यावतीने आयोजित एकदिवशीय उद्योग-शैक्षणिक संस्था संवाद कार्यशाळेच्या कार्यक्रमाच्या उदघाटन प्र. कुलगुरू प्रा. डॉ.पी.एस.पाटील यांच्या हस्ते झाले याप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

पहिल्या सत्रात सी. ए. नितीन हारुगडे, कोल्हापूर यांनी विद्यार्थ्यांना स्वप्ने मोठी पाहून स्वतःला अद्ययावत करणे गरजेचे आहे. आज प्रत्येक व्यवसायात चांगली संधी आहे. ती शोधून योग्य वेळी पाऊल उचलणे ही काळाची गरज आहे. सूक्ष्म मध्यम व लघु उद्योगांबाबत, भांडवल उभारणी, प्रकल्प अहवाल, प्रक्रिया उद्योग इत्यादीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

दुसऱ्या सत्रात श्री संग्राम पाटील प्रसिद्ध उद्योजक, मार्व्हलस, उद्योग समूह कोल्हापूर यांनी आपल्या भाषणात भारताला महासत्ता बनवण्याचा मार्ग डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी दिला.

विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी प्रचंड कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे तसेच यशस्वी होण्यासाठी भूक निर्माण झाली पाहिजे. लोकांच्या बरोबर काम करण्याची क्षमता असायला हवी तसेच उद्योगांबरोबर समाजाची सामाजिक जबाबदारी घेणे हे सुद्धा तितकेच आवश्यक असल्याचे मत श्री पाटील यांनी व्यक्त केले.

दुपारच्या सत्रात संजय पेंडसे, केपी मशीन्स कोल्हापूर यांनी कोणताही उद्योग सुरू करताना सखोल अभ्यास, प्रत्यक्ष अनुभव, कौशल्य, प्रामाणिकपणा, सचोटी, पद्धतशीरपणा, प्रचंड मेहनतयाच्या जोरावर जीवनात यशस्वी होता येते असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्याप्रसंगी एमबीए विभागाचे प्र.संचालक, प्राध्यापक डॉ.ए.एम. गुरव, प्रा.डॉ.दीपा इंगवले, डॉ. केदार मारुलकर व डॉ. रामदास बोलके आदी उपस्थित होते. सदर कार्यशाळेस व एम.बी.ए व एम.कॉमचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

0 6 DEC 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘स्तुती’मुळे देशांतर्गत उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन

## डॉ. भट्टाचार्य : विद्यापीठात प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रशिक्षित मानव संसाधन निर्माण करणे हे भारत सरकारसमोरील आव्हान आहे. ‘स्तुती’मुळे देशांतर्गत उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असे प्रतिपादन भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित ‘स्तुती’ प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्लीचे प्रा. केदार सिंग, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य, प्रा. आर. जी. सोनकवडे.**

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित शिवाजी विद्यापीठ येथे ‘स्तुती’ प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्लीचे प्रा. केदार सिंग, ‘स्तुती’चे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते. डॉ. भट्टाचार्य यांनी शिवाजी विद्यापीठातील अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र पाहून समाधान व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये नवनवीन संशोधन करण्यासाठी प्रेरणा मिळेल. त्याचप्रमाणे मेक इन इंडियाअंतर्गत अशा प्रकारची अत्याधुनिक उपकरणे भारतात कशाप्रकारे बनवली जाऊ शकतात यावर संशोधन होणे गरजेचे आहे, असे मत प्रा. सिंग यांनी व्यक्त केले. प्रशिक्षण कार्यक्रमात सात दिवस दिल्ली, बंगळूर, मंगळूर, मुंबई, पुदुचेरीमधील १४ तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने होणार आहेत. प्रगतशील उपकरणावर तांत्रिक बाबींची माहिती सर्वांना दिली जाणार आहे. प्रज्ञा राजे यांनी सूत्रसंचालन केले. ‘स्तुती’ प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

0 6 DEC 2022
जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी
[illegible]वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'विधी'ची फेरपरीक्षा एमसीक्यू पद्धतीने घ्या

## ऑल इंडिया यूथ फेडरेशनची मागणी : विद्यापीठासमोर आंदोलन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठांतर्गत होणाऱ्या विधी शाखेच्या तीन व पाचवर्षीय अभ्यासक्रमातील रिपिटर विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घ्यावी. तसेच सीआरपीसी विषयाचे ६, ९, २५ या प्रश्नांचे मार्क मिळावेत, अशी मागणी सोमवारी ऑल इंडिया यूथ फेडरेशनतर्फे केली. यावेळी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठ आवारासमोर निदर्शने करत विविध मागण्यांचे निवेदन



कोल्हापूर : विद्यापीठ गेटसमोर आंदोलन करताना ऑल इंडिया यूथ फेडरेशनचे पदाधिकारी. (छाया : अर्जुन टाकळकर)

विद्यापीठ प्रशासनाला दिले. हे आंदोलन अभिजित खोत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

खोत म्हणाले, आयपीआर विषयाचा चुकीच्या पद्धतीचा पेपर विद्यापीठाने सेट केला होता. त्यामुळे त्याची रिएग्झाम घेतली गेली. एकाचवेळी दीड हजार विद्यार्थ्यांनी याबाबतचा मेल प्रशासनाला पाठवला होता. याचा त्रास विद्यार्थ्यांना झाला असून, विद्यापीठाने अमरावती विद्यापीठाप्रमाणे एक विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांना १० ग्रेस मार्क द्यावेत. लेबर लॉ विषयामध्ये प्रश्न क्रमांक २१ हा चुकीचा होता, त्याचेही गुण विद्यापीठाने द्यावेत.

आंदोलनात प्रमोद दाभाडे, मारुती चौगुले, सविता निरुखे, संदीप कांबळे, राजन खिलारे, राम कृपलाणी, प्रिया गुरव सहभागी झाले होते.

06 DEC 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘स्तुति’मुळे उत्पादकता वाढीस प्रोत्साहन : डॉ. भट्टाचार्य

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जगाच्या प्रगतीचा वेग तंत्रज्ञानामुळे वाढला आहे. यामुळे नवनवी आव्हाने निर्माण होत आहेत. यासाठी प्रशिक्षित मानव संसाधन निर्माण करणे हे भारतासमोर मोठे आव्हान आहे. हे आव्हान यशस्वीपणे पेलण्यासाठी स्तुति महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आहे. स्तुतिमुळे देशांतर्गत उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळत असल्याचे प्रतिपादन भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य यांनी येथे केले.



**कोल्हापूर : स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमात उपस्थित प्रा. केदार सिंग, डॉ. अरिंदम भट्टाचार्य, प्रा. आर. जी. सोनकवडे आदी.**

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित स्तुति प्रशिक्षण कार्यक्रम शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन सोमवारी झाले. प्रमुख पाहुणे म्हणून शास्त्रज्ञ डॉ. भट्टाचार्य बोलत होते. यावेळी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्लीचे प्रा. केदार सिंग, स्तुतिचे समन्वयक, प्रा. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते. देशभरातून आलेल्या मान्यवरांनी शिवाजी विद्यापीठाचे अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र पाहिले. अशा सुविधांचे व्यवस्थापन केल्याबद्दल प्रा. सोनकवडे व टीमचे अभिनंदन केले. २०१३-१४ मध्ये पहिले सैफ केंद्र सुरू केले होते. आता ही संख्या देशभरात १७ केंद्र इतकी झाली आहे. देशभरातील ९४ टक्के अत्याधुनिक उपकरणे ही भारताबाहेरून आली आहेत. त्यासाठी देशांतर्गत उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून स्तुति कार्यक्रम आयोजित केल्याचेही स्पष्ट करण्यात आले. प्रज्ञा राजे यांनी सूत्रसंचालन केले. स्तुति प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

06 DEC 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी वि. रा. शिंदे यांचे विचार कृतीतून अंमलात आणा

## डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे प्रतिपादन : सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमाला

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शेतकऱ्यांचे प्रश्न, वंचितांचे प्रश्न, महिलांचे प्रश्न आजही गंभीर स्वरूपाचे आहेत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या समस्यांसाठी कृतीयुक्त लढा दिला. समकालीन प्रश्न सोडविण्यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे विचार कृतीतून अंमलात आणण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, शहाजी छत्रपती महाविद्यालयातील इतिहास विभाग व कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे संशोधन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. 'महर्षी वि. रा. शिंदे यांच्या विचारांची प्रस्तुतता' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.



**कोल्हापूर : सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे. सोबत प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, हंबीरराव पाटील, डॉ. सुरेश शिखरे, रवींद्र भोसले, आदी.**

डॉ. लवटे म्हणाले, धर्म, जात, पंथ, वंश यांच्यापलीकडे जाऊन समाजातील शेवटच्या शोषित-वंचित घटकांपर्यंत न्यायहक्कासाठी त्यांनी लढा दिला. समाजासमोर मांडलेल्या तत्त्वानुसार ते वागत होते. अमेरिकेत जाऊन त्यांनी सर्व धर्मांचा चिकित्सक अभ्यास केला. त्याचे आचरण करून मानवकल्याण साधले पाहिजे. परंतु धर्ममार्तंड आपल्या स्वार्थासाठी समाजाला अंधश्रद्धाळू बनवून त्यांचे शोषण करतात. आजच्या युगात धर्माच्या जोखडात गुंतून न पडता सर्वसमावेशक जीवन जगले पाहिजे.

प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण म्हणाले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे संशोधन केंद्रातील विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न होत असल्याचे सांगितले. फुले, शाहू, आंबेडकर, महर्षी शिंदे, दाभोलकर यांचे विचारच समाजाला तारतील, असे ते म्हणाले. या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

प्रास्ताविक डॉ. एस. व्ही. शिखरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. एस. एस. पाटील यांनी करून दिला. सूत्रसंचलन प्रा. पी. के. पाटील यांनी केले. आभार प्रा. एस. डी. अपराध यांनी मानले.

या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. एस. डी. जाधव यांनी केले. यावेळी सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील यांचे नातू हंबीरराव पाटील, सुनील नागावकर, प्रकाश आमटे, प्रबंधक रवींद्र भोसले, ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. एन. एस. जाधव आदी उपस्थित होते.

0 6 DEC 2022
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्तुती कार्यक्रमातून उत्पादकता वाढण्यास प्रोत्साहन

## विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरींदम भट्टाचार्य : शिवाजी विद्यापीठात स्तुती प्रशिक्षण कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशभरातील ९४ टक्के अत्याधुनिक उपकरणे ही परदेशातून खरेदी केली जातात. स्तुती कार्यक्रमांच्या माध्यमातून कौशल्याधिष्ठित पूरक मनुष्यबळ निर्माण होणार असल्याने भारतातील देशांतर्गत अत्याधुनिक उपकरणांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे, असे प्रतिपादन विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरींदम भट्टाचार्य यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. केदार सिंग यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती



कोल्हापूर : स्तुती कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना शास्त्रज्ञ डॉ. अरींदम भट्टाचार्य. डॉ. केदार सिंग, डॉ. आर. जी. सोनकवडे.

होती. स्तुतिचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली.

डॉ. भट्टाचार्य म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील अत्याधुनिक उपकरणे, केंद्रातील सुविधा अतिशय चांगल्या आहेत. या उपकरणांचा फायदा सर्वच संशोधकांना होणार आहे. सरकारने दिलेल्या अत्याधुनिक उपकरणे आणि सुविधांचे योग्य व्यवस्थापन प्रा. सोनकवडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. २०१३-१४ मध्ये पहिले सैफ केंद्र सुरू झाले होते आता देशभरात १७ सैफ केंद्र सुरू आहेत. त्यापैकी शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्र अतिशय उत्तम आहे. प्रा. केदार सिंग म्हणाले, संशोधन संस्था, राज्य विद्यापीठ संशोधनात महत्वाची भूमिका बजावते. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये नवनवीन संशोधन करण्यासाठी प्रेरणा मिळेल. त्याचप्रमाणे मेक इन इंडिया अंतर्गत अशा प्रकारचे अत्याधुनिक उपकरणे भारतात कशाप्रकारे बनवली जाऊ शकतात यावर संशोधन होणे खूप गरजेचे आहे.

डॉ. सोनकवडे म्हणाले, काश्मीरपासून सुरू झालेला स्तुती कार्यक्रम व्हीं. आय. टी. वेल्लोर, आय. आय. टी. जोधपूर, डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर केंद्रीय विद्यापीठ, लखनऊ, बिर्ला इन्स्टिट्यूट, गोवा, केरळ विद्यापीठ नंतर प्रथमच केंद्रशासित प्रदेशात म्हणजे पाँडिचेरी इथे, मंगळुरू, दार्जिलिंग, गुवाहाटी, नागपूर आदी ठिकाणी शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचावले आहे. सध्या विद्यापीठातील स्तुती कार्यक्रम पंधरावा आहे. या कार्यक्रमात सात दिवस दिल्ली, बंगलोर, मंगळूर, मुंबई, पाँडिचेरी आदी ठिकाणहून १४ तज्ज्ञ संशोधक मार्गदर्शन करणार आहेत. सहभागी शिक्षक, प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांना आधुनिक उपकरणांचे गटानुसार प्रात्यक्षिक दाखविले. सहभागीपैकी काहींनी आणलेले सॅम्पल देखील टेस्ट करून दिले. प्रज्ञा राजे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.